REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २६ जून, १९४० अंक २६

## पैसा फंड ग्लास वर्क्स

तळेगांव (दाभाडे)

कारखान्यांत पूर्वीचा माल चिमण्या, बांगड्या, पेपरवेटस्, चिनीमातीच्या बरण्या, वगैरे मिळत असून नवीन इलेक्ट्रिक शेडस् व ग्लोबस् मिळतात.

कॅटलॉग व माहिती मागवा.

सुपरिंटेंडन्ट
पैसा फंड ग्लास वर्क्स, तळेगांव.

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कँटब), बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहाहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली

दि

## ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.

हेड ऑफिस–जळगांव, पू. खा.
एजन्सीकरितां आजच लिहा.
ब्रँच ऑफिस–लक्ष्मीरोड, पुणें.

पूर्ण स्वदेशी,
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

## विविध माहिती

### तरुण सेनानायक

आतांपर्यंत होऊन गेलेल्या सेनानींत तरुणांचा भरणा अतिशय मोठा आहे. हॅनिबॉलनें रोमनांचा पहिला पराभव केला, त्यावेळीं त्याचें वय २९ होतें. ॲलेक्झँडर दि ग्रेट ह्यानें पर्शियन साम्राज्याचा नाश केला त्यावेळीं तो २२ वर्षांचा होता. नेपोलियन बोनापार्टनें २७ व्या वर्षीच आपल्या लष्करी पराक्रमाचें शिखर गाठलें. १७९२ ते १८०४ ह्या मुदतींत जेवढे फ्रेंच जनरल मृत्युमुखीं पडले, त्यांतील ४१ जनरलांचें वय ४० पेक्षा कमी होतें.

### रेंगाळणारीं युद्धें

गेलें महायुद्ध अगर अमेरिकेंतील अंतस्थ युद्ध हीं सोडल्यास आतांपर्यंतचीं बहुतेक युद्धें रेंगाळत चाललीं असल्याचें आढळतें. ग्रेटब्रिटन आणि अमेरिका ह्यांतील शेवटच्या युद्धास जून, १८१२ मध्यें प्रारंभ झाला, परंतु मे १८१३ पर्यंत एकहि लढाई झाली नाहीं. नेपोलिअनशीं ग्रेटब्रिटनचें युद्ध १२ वर्षें चाललें होतें, परंतु त्यांतील कित्येक महिने शांततेचे गेले. स्पेननें ग्रेटब्रिटनविरुद्ध जून १७७९ मध्यें युद्ध पुकारलें, परंतु त्यांतील पहिली मोठी लढाई नंतर सात महिन्यांनीं झाली. सात वर्षांच्या युद्धांतहि असेंच घडलें. २०० वर्षांपूर्वी ड्यूक ऑफ मार्लबरोच्या नेतृत्वाखालीं ग्रेटब्रिटननें फ्रान्सशीं युद्ध केलें त्यावेळीं ११ वर्षांत केवळ ४ प्रमुख लढाया झाल्या.

### ३० लक्ष पुस्तकांचा नाश

झेकोस्लोव्हाकियांतील ३० लक्ष पुस्तकांचा नाश करण्यांत येणार आहे. झेक रेल्वेजवरील रूळ काढून घेऊन तेथें जुने रूळ बसविण्याचें कामहि चालू आहे.

### यू–२३५

यू–२३५ नांवाचा एक नैसर्गिक पदार्थ अमेरिकेंतील शास्त्रज्ञांनीं शोधून काढला आहे. तो पाण्यांत ठेवला असतां शक्ति निर्माण होऊन पाण्याची वाफ होते. १ पौंड यू–२३५ पासून जेवढी शक्ति निर्माण होते, तेवढी निर्माण करण्यास २,५०० टन कोळसा लागतो. तूर्त यू–२३५ चें फारच अल्प प्रमाणावर उत्पादन करण्यांत आलें आहे, परंतु लवकरच त्याचें उत्पादन वाढवितां येऊन कारखान्यांतून आणि लष्करांत त्याचा उपयोग करतां येऊं लागेल अशी अपेक्षा आहे. यू–२३५ हा पदार्थ युरेनियमचा निकटवासी आहे.

### कलकत्ता ट्रॅमवेज कं. लि.

कलकत्ता ट्रॅमवेज् कंपनी लि., ची वार्षिक सभा लंडन येथें नुकतीच भरली होती. ३१ डिसेंबर, १९३९ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीस सुमारें १५ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस ५½ % डिव्हिडंड मिळालें.

### अमेरिकन कापडास मागणी

युरोपमधील युद्धपरिस्थितीमुळें तेथें होणारा अमेरिकन कपाशीचा उठाव कमी झाला असला तरी अमेरिकेंतील गिरण्यांत बनविलेल्या कपास कापडास परदेशांत मोठी मागणी येत आहे.

### गिरण्यांच्या आगीचा विमा

ग्रेटब्रिटनमधील कपास कापडाच्या गिरण्यांस लागणाऱ्या आगींमुळें होणारें नुकसान लक्षांत घेऊन तेथील विमा कंपन्यांनीं आपले हप्त्यांचे दर वाढविण्याचें ठरविलें आहे. गिरण्यांत स्वच्छता राखणें, यंत्रांस बकशीरपणें तेल देणें, लायक लोकांस देखरेखीसाठीं निवडणें, आग विझविण्याच्या साधनांचा पुरेसा संग्रह ठेवणें, इत्यादि बाबतींत गिरण्यांनीं अधिक दक्षता बाळगावी, अशी विमा कंपन्यांचीं त्यांस विनंति आहे.

### सरकारी नोटांवरील जनतेचा विश्वास

कांहीं लोकांची, पोष्टांतील सेव्हिंग्ज बँकांतून पैसे काढण्याची आणि नोटा मोडून पैसे करण्याची प्रवृत्ति मध्यंतरी दिसून येत होती, ती आतां नाहींशी झाली असल्याचें दिसून येत आहे.

### साखरेची सरकारी खरेदी

हिंदुस्थान सरकारनें इंडियन शुगर सिंडिकेटकडून दर मणास ३ रु. १२ आ. ह्या दरानें ११ लक्ष पोतीं विकत घेतलीं आहेत.

### सोडा ॲशच्या आयात जकातीवर माफी

सोडा ॲशच्या आयातीवरील जकातीस १९३५ सालीं हिंदुस्थान सरकारनें माफी दिली. माफीची मुदत २२ जून, १९४० पर्यंत वाढविण्यांत आली. ही मुदत आणखी २ वर्षांनीं वाढविण्यांत आली आहे.

### घरें बांधणें तहकूब

युद्धपरिस्थितीमुळें घरें बांधण्याच्या लोकांच्या प्रवृत्तीस आळा बसला आहे.

### इनकम टॅक्स अपेलेट ट्रायब्यूनल

१९३९ च्या इनकम टॅक्स ॲक्टानें योजिलेल्या अपेलेट ट्रायब्यूनलची नेमणूक येत्या वर्षअखेर केली जाईल.

### इजिप्तला हिंदी कोळसा पाहिजे

इजिप्तकरितां आणि तेथील रेल्वेजकरितां ३ लक्ष टन कोळसा आणि सुदानमधील रेल्वेजकरितां १६ हजार टन कोळसा हिंदुस्थान देऊं शकेल काय, अशी पृच्छा ॲलेक्झँड्रिया येथील इंडियन ट्रेड कमिशनरनें हिंदुस्थान सरकारकडे केली आहे.

### ब्रिटिश युद्ध–कर्ज

१९४५ ते १९४७ ह्या दरम्यानच्या परतफेडीचें २½ % दराचें युद्ध–कर्ज ब्रिटिश सरकारनें उभारलें आहे.

### बाटा शू कंपनी

बाटा शू कंपनी लि. चा हिंदुस्थानांतील व्यवहार पूर्ववत् चालू रहाण्यास परवानगी देण्यांत आली आहे. डिफेन्स ऑफ इंडिया नियमाप्रमाणें त्या कंपनीवर अर्थातच सरकारी देखरेख राहील.

### ई

इंग्रजी मार्षेतील ई हें अक्षर एकूण प्रत्येक १,००० अक्षरांत १३७ वेळां उपयोगांत आलेलें आढळतें.

### टपालाची वहातूक

हिंदुस्थानांतून इंग्लंडकडे विमानमार्गे जाणारें टपाल आतां आगबोटींतूनच जाऊं लागलें आहे.

### म्हैसूरची औद्योगिक प्रगति

औंधचे राजेसाहेब ह्यांस म्हैसूर चेंबरचे अध्यक्ष आणि सभासद ह्यांनीं अल्पोपाहारास बोलावून त्यांचा सत्कार केला, त्यावेळीं चेंबरचे अध्यक्ष, श्री. नारायणराव नाईक, ह्यांनीं स्वागतपर भाषण केलें. राजेसाहेबांनीं म्हैसूरच्या औद्योगिक प्रगतीसंबंधीं धन्योद्गार काढले.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३०२ | युद्ध घटना—फ्रान्समध्यें युद्ध तहकुबी आणि इंग्लंड-मध्यें युद्धाची तयारी | |
| २ सिमल्याची साखर परिषद् ... | ३०३ | ५ स्वदेशी साखरेच्या धंद्यां-च्या अडचणी ... | ३०७ |
| ३ प्राथमिक शाळांचा नवा अभ्यासक्रम ... | ३०४ | ६ पृथ्वीचा नकाशा बद-लणार ... | ३०९ |
| ४ स्फुट विचार ... | ३०५ | ७ फ्रान्स ... | ३१० |
| उत्तर हिंदुस्थानांतील साख-रेचे कारखाने—दक्षिण-हिंदुस्थानांतल्या साखरेचे हितसंबंध—फ्रान्समधील | | ८ निवडक बाजारभाव | ३११ |


# अर्थ

बुधवार, ता. २६ जून, १९४०

## सिमल्याची साखर–परिषद्

आज हिंदी साखरेच्या धंद्यासंबंधानें उपस्थित झालेला अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे खपाच्या मानानें उत्पादन अधिक झालें आहे आणि होत आहे, त्याची व्यवस्था लावण्याविषयींचा आहे. हिंदुस्थानांत दर वर्षी सुमारें १० लक्ष टन साखर खपते आणि चालू सालांतलें उत्पादन व गेल्या वर्षांतील शिल्लक मिळून १३-१४ लक्ष टन माल होईल असा अंदाज आहे. चालू वर्षी उसाची लागवड सर्व देशभर मोठ्या प्रमाणांत झाली आहे आणि त्या योगानें येत्या हंगामांत साखरेचा पुरवठा भावी उठावाचे मानानें अधिक होण्याची भीति आहे. मागणी आणि पुरवठा ह्यांचेमध्यें ह्या रीतीनें मोठें अंतर पडल्यामुळें साखरेचा भाव उतरणें सहाजिक आहे आणि तो उतरला असतां, कारखाने व ऊस पिकवणारा शेतकरी ह्यांचें नुकसान होऊन साखरेचा सबंध स्वदेशी धंदा संकटांत आल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या परिस्थितीवर कोणते उपाय योजावे ह्याचा विचार करण्यासाठी सिमला येथें नुकतीच कारखानदारांची परिषद हिंदुस्थान सरकारनें बोलावली होती. तींत साखरेचे व्यापारी व कारखानदार ह्यांनीं आपलें म्हणणें सरकारपुढें मांडलें आणि सरकारचे व्यापारमंत्रि, सर रामस्वामी मुदलियार, ह्यांनीं आपले विचार प्रकट केले. संयुक्तप्रांत आणि बिहार येथील कारखानदारांची एक सिंडिकेट म्हणजे संघ आहे, त्यानें अशी मागणी केली होती कीं, हिंदी साखरेचा फाजील पुरवठा झाला आहे, त्याचा उठाव होण्यास सहाय म्हणून ब्रिटिश सरकारनें कांहीं साखर हिंदुस्थानांत खरेदी करावी. केवळ किंमतीच्या दृष्टीनें विचार करतां हिंदी साखरेच्या मानानें बाहेरील साखर ब्रिटिश सरकारास स्वस्त पडत असल्यानें वरील मागणी मान्य होण्याच्या मार्गांत अडचण उपस्थित झाल्यासारखी दिसत होती. तथापि, ब्रिटिश सरकारचें मन हिंदुस्थान सरकारनें वळवून हिंदी कारखानदारांचे म्हणण्यास मान्यता मिळेल अशी तजवीज करावी अशी सूचना करण्यांत आली होती.

सिमला येथील परिषदेंत सर रामस्वामी ह्यांनीं असें आश्वासन दिलें असल्याचें समजतें कीं, ब्रिटिश सरकारानें हिंदी साखर विकत घेण्याचें अभिवचन दिलें असून तिच्या किंमतीविषयीं बोलणीं चालली आहेत. सध्याच्या प्रसंगीं जाव्हाची साखर हिंदुस्थानांत स्वस्त विकली जाऊं नये ह्या विषयींहि खबरदारी घेतली जावी असें हिंदी कारखानदारांचें म्हणणें होतें त्याचाहि विचार सरकार सहानुभूतिपूर्वक करीत असल्याचें सर रामस्वामी ह्यांनीं परिषदेस सांगितलें. परिषदेंत उपस्थित असलेल्या मंडळीपुढें सरकारच्या वतीनें त्यांनीं तीन महत्त्वाचे प्रश्न मांडले आणि त्यांचे संबंधांत आपला अभिप्राय व्यक्त करण्याची परिषदेस सूचना केली. ह्या संबंधांतल्या एकूण परिस्थितीची योग्य कल्पना येण्यास थोडेसें स्पष्टीकरण होणें आवश्यक आहे. संयुक्त प्रांत आणि बिहार ह्यांमधील साखरेच्या धंद्याचें नियंत्रण करण्यासाठीं एक स्वतंत्र कायदा मध्यवर्ती सरकारानें केला असून त्यास अनुसरून शुगर कंट्रोल बोर्ड स्थापन करण्यांत आलें आहे. ह्या प्रांतांतील बहुतेक कारखानदार स्वतःचा ऊस करीत नाहींत आणि तो शेतकऱ्यांचेकडून विकत घेतात. ह्या उसाची योग्य किंमत शेतकऱ्यांस मिळावी म्हणून प्रांतिक सरकारास किमान व कमाल भाव ठरवण्याचा अधिकार दिलेला आहे. हा भाव साखरेच्या किंमतीप्रमाणें कमी-जास्त केला जातो. ह्या व्यवस्थेमुळें साखरेच्या बाजारांत गोंधळ उडतो. उसाचें पीक कमी-अधिक होतें आणि कारखानदार स्वतःस हवा इतकाच ऊस घेऊं शकतात. साखरेच्या व्यापाऱ्यांसहि मालाच्या किंमतींत चढ-उतार झाल्यानें आपले व्यवहारांत अडचण येते असें वाटतें. साखरेची किंमत चढली कीं, उसाची किंमत चढते आणि उसाची किंमत, चढली कीं, साखरेची किंमत चढणें अपरिहार्य होतें. तेव्हां, ह्या रीतीनें साखरेच्या भावावर अवलंबून ठेवण्यांत आलेली उसाची किंमत निश्चित करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास असावा कीं काय हा येथें महत्त्वाचा प्रश्न आहे आणि तो सर रामस्वामी ह्यांनीं सिमल्याच्या परिषदेपुढें मांडला. तीमध्यें विशिष्ट असा ठराव मंजूर झाला नाहीं, तथापि, परिषदेचें सर्वसाधारण मत असें पडलें कीं, साखरेच्या बाजारभावास अनुसरून उसाची किंमत वर-खालीं करण्याची व्यवस्था श्रेयस्कर नाहीं. टारिफ बोर्डानें सुचवल्याप्रमाणें उसाची योग्य दिसणारी किंमत ठरवण्यांत यावी आणि साखरेचा सरासरीचा भाव चांगला होता असें हंगामाचे अखेर आढळून आल्यास त्या मानानें शेतकऱ्यांस कारखान्यांनीं बोनस द्यावें अशी सूचना परिषदेंत करण्यांत आली.

संयुक्त प्रांत व बिहार येथें, वर सांगितल्याप्रमाणें नेमण्यांत आलेल्या शुगर कंट्रोल बोर्डास साखरेची किमान किंमत ठरवण्याचा आणि योग्य वाटल्यास कांहीं काळपर्यंत साखर विक्रीस काढण्यास प्रतिबंध करण्याचा अधिकार असावा कीं काय हा दुसरा प्रश्न सर रामस्वामी ह्यांनीं उपस्थित केला होता आणि ज्यास संरक्षण देण्यांत आलें आहे अशा धंद्याचे बाबतींत साखरेच्या विक्रीवर व तिच्या किंमतीवर नियंत्रण घालण्याचा अधिकार एखाद्या बोर्डास देणें योग्य नाहीं असें मत सर रामस्वामी ह्यांनीं आपल्या भाषणांत व्यक्त केलें होतें. औद्योगिक संरक्षणाचा मुख्य हेतु हा असतो कीं, उत्पादनांत वाढ व्हावी आणि मालाची किंमत जनतेच्या सोयीसाठीं परस्पर-स्पर्धेच्या योगानें उतरावी. ह्या स्पर्धेच्या मार्गांत किंमतीच्या नियंत्रणामुळें व्यत्यय येणें

म्हणजे संरक्षणाचा उद्देश निष्फळ करणें होय. हिंदुस्थान सरकारास ही बाब लक्षांत घेणें अगत्याचें आहे. हा मुद्दा सर रामस्वामी ह्यांनीं जोरानें पुढें मांडला. शुगर कंट्रोल बोर्डाचा उद्देश व कार्यक्षेत्र ह्यांचा फेरविचार सरकारनें करावा आणि त्या बाबतींत अधिकाराचें आकुंचन करण्याची आवश्यकता आहे कीं नाहीं हें ठरवावें असा अभिप्राय परिषदेनें व्यक्त केला. तिसरा प्रश्न तिच्यापुढें मांडण्यांत आला तो साखरेच्या धंद्याचे संबंधांत सल्ला देण्यासाठी एक मंडळ नेमण्याविषयीं होता. निरनिराळे प्रांत आणि संस्थानें ह्यांच्या गरजा व परिस्थिति ह्यांचा विचारहि ह्या सल्लागार मंडळाच्या विद्यमानें होऊं शकेल आणि हें मंडळ कारखानदार व सरकार ह्यांस उपयोगी पडेल. प्रांतिक व संस्थानी सरकारांचा अभिप्राय ह्या संबंधांत घेण्याचें आश्वासन सर रामस्वामी यांनीं दिलें. सिमल्याच्या परिषदेंत दीर्घगामी परिणामकारक प्रश्नांचा निकाल झाला नाहीं आणि होणें अशक्यहि होतें. पण निकडीच्या प्रश्नांचीं चर्चा तेथें झाली आणि महत्त्वाच्या इतर बाबींच्या निकालाची पूर्व तयारीहि झाली, ही त्या परिषदेच्या कार्याची फलश्रुति आहे. सध्याचा साखरेचा साठा, ब्रिटिश सरकारनें कांहीं उठाव केल्यास, कमी होऊन ह्या धंद्याच्या डोक्यावरचा बोजा हलका होईल. स्वदेशी साखरेच्या धंद्याचा पाया भक्कम होण्यास सरकारनें सहाय देणें आणि कारखानदारांनीं संघटनात्मक व सहकारात्मक पद्धतीनें वागणें अगत्याचें आहे.

## प्राथमिक शाळांचा नवा अभ्यासक्रम

### संकुचित वृत्ति निर्माण होऊं नये म्हणून प्रयत्न

२५ वर्षांपूर्वी आंखलेल्या अभ्यासक्रमानुसार सध्या मुंबई इलाख्यांतील प्राथमिक शाळांतून पुस्तकें लावण्यांत येत असून त्यांवर अलीकडे वृत्तपत्रांतून बरीच टीका होत आहे. पुस्तकें फाजील साहित्यिक स्वरूपाची असल्यानें प्राथमिक शाळांच्या आजच्या गरजा त्यानें भागत नाहींत असा सर्वसाधारण टीकेचा रोख आहे.

तेव्हां डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांनीं नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या एका डिपार्टमेंटल कमिटीनें एक तात्पुरता अभ्यासक्रम आंखला. त्यावेळीं स्कूल बोर्डांनीं केलेल्या सूचनांचा व टीकेचा योग्य तो विचार झाला व तो प्रथम सरकारी व निमसरकारी ट्रेनिंग संस्थांच्या प्रॅक्टिसिंग स्कूलसमधून प्रयोगादाखल सुरू झाला. तेथील वरिष्ठांकडून व तपासणी अधिकाऱ्यांकडून त्यासंबंधीं आलेले अहवाल इतके समाधानकारक होते कीं, सर्व प्राथमिक शाळांतून तो सुरू करण्यास कोणताच प्रत्यवाय नव्हता.

अभ्यास करतांना एक साच्याचेच परिश्रम करावे लागल्यामुळें एक प्रकारची संकुचित वृत्ती निर्माण होते ती होऊं नये व प्रत्येक शाळेस आपल्यास योग्य वाटेल त्या विषयाची मनाजोगती निवड करतां यावी अशा रीतीनें हा अभ्यासक्रम आंखला आहे. व्होकेशनल ट्रेनिंग कमिटीनें केलेल्या शिफारशी विचारांत घेऊन, शाळेंतील अभ्यासाचा मुलांच्या दैनंदिन जीवनाशीं मेळ बसेल अशा रितीनें मुलांचा अभ्यास घेण्याची सूचना केली आहे.

प्राथमिक शाळांसाठी हा नवा अभ्यासक्रम सरकारनें मंजूर केला आहे व १९४० च्या जूनपासून तो इन्फंट व पहिल्या चार इयत्तांतून सुरू करावा असा हुकूम दिला आहे. पांचवी, सहावी व सातवीचा अभ्यासक्रम मात्र अनुक्रमें १९४१, १९४२ व १९४३ मध्यें सुरू व्हावयाचा आहे. अभ्यासक्रमाचें प्रादेशिक भाषांतून भाषांतर करण्यांत येत असून छापून झाल्यावर तो इंग्रजी व प्रादेशिक भाषांतून प्रसिद्ध करण्यांत येईल.


## धी बँक ऑफ इंडिया लिं.

[स्थापना—७ सप्टेंबर १९०६]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,११,००,००० |

डायरेक्टर्स—सर चनीलाल मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के., के. टी. (रजेवर), मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई; ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. फेराई

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

शाखा—बुलियन एक्सचेंज (शेख मेमन स्ट्रीट, मुंबई), बांद्रे (मुंबईनजीक), मलबार हिल (मुंबई), कुलाबा (मुंबई), काळबादेवी, (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंघी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर (किंग्जवे), जमशेदपूर

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय, ट्रस्टी, या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

### लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल.......रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल ...रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल.........रु. | ३,२४,३०० |
| वसूल झालेलें भांडवल...रु. | १,६२,१५० |

### शाखा

(१) अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट मुंबई. | (२) डेक्कन, जिमखाना पुणें ४.

### डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन; श्री. डी. के. साठे. व्हा. चेअरमन; श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे. श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एस. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे. श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एस. व्ही. मोरवडे, मॅनेजर.

# स्फुट विचार

## उत्तर हिंदुस्थानांतील साखरेचे कारखाने

इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचे उपाध्यक्ष, मि. खारेघाट, ह्यांनीं त्या कौन्सिलच्या, साखर समितीच्या सिमला येथें भरलेल्या सभेंत प्रास्ताविक भाषण केलें. त्याचा सारांश आम्हीं आजच्या अंकांत दुसरीकडे दिला आहे. त्यावरून स्वदेशी साखरेच्या धंद्याच्या सद्य:परिस्थितीवर व भवितव्यावर उत्कृष्ट प्रकाश पडला आहे. येथें आम्हांस एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट प्रामुख्यानें पुढें मांडावयाची आहे. सध्या स्वदेशी साखरेचा पुरवठा मागणीच्या मानानें फाजील झाला आहे आणि हा वाढावा येत्या हंगामांत साखरेची किंमत उतरवण्यास कारणीभूत होण्याची भीति आहे. संयुक्त प्रांत व बिहार येथील कारखानदारांनीं अशी भ्रामक कल्पना प्रसृत केली आहे कीं मुंबई, मद्रास, बंगाल वगैरे प्रांतांत उसाची लागवड व साखरेचें उत्पादन अलीकडे वाढल्याकारणानें साखरेचे भाव खालीं जाऊन सबंध धंद्याचें नुकसान होत आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं उत्तर हिंदुस्थानांतील वरील प्रांतांत उसाची लागवड एवढ्या प्रमाणांत होत आहे कीं तेथील सर्व ऊस गुळासाठी व साखरेसाठी गाळणें कठिण होऊन गेलें आहे. तिकडील बहुतेक सर्व कारखाने स्वत:चा ऊस करीत नसून भोंवतालच्या शेतकऱ्यांकडून तो विकत घेतात. ह्या उसाची योग्य किंमत तो पिकवणारांच्या पदरांत पडावी अशा साहजिक इच्छेनें प्रांतिक सरकारांस उसाच्या किंमती ठरवून द्याव्या लागतात. आपणांस ऊस महाग पडतो म्हणून कारखानदार साखरेच्या किंमती चढवतात आणि साखरेस चांगला भाव आल्यानें व त्या प्रमाणांत गुळाच्या किंमती ठरवल्या जात असल्यामुळें उसाच्या लागवडीस उत्तेजन मिळतें. कार्य-कारणाचें असें हें वर्तुळ आहे. ह्या परिस्थितींत मुंबई, मद्रास वगैरे प्रांतांत उसाच्या लागवडीचा व साखरेच्या कारखान्यांचा विस्तार होत आहे आणि ह्या कारणानें स्वदेशी साखरेच्या धंद्यांत बिघाड होत आहे अशी ओरड उत्तर हिंदुस्थानांतील कारखानदारांनीं करण्यांत कांहींच स्वारस्य नाहीं.

## दक्षिण हिंदुस्थानांतल्या साखरेचे हितसंबंध

ह्या ओरडीच्या भ्रामकपणाचें आविष्करण आम्हीं अनेक वार केलें आहे. हिंदुस्थानासारख्या अफाट देशाच्या एका भागांत साखर कारखान्यांचें एकत्रीकरण होऊन त्यांनीं सर्व प्रांतांच्या कानाकोपऱ्यांत आपला माल खपवून तेथील लोकांनीं स्वत: साखर करूं नये असा आग्रह धरणें अशास्त्रीय व अयोग्य आहे. वास्तविक रीतीनें देशाच्या निरनिराळ्या भागांत योग्य प्रमाणांत साखरेचे कारखाने स्थापन होऊन त्यांच्या उत्पादनशक्तीची आणि मालाची सारखी वाटणी झाली पाहिजे. ह्या तऱ्हेचा कारखान्यांचा विस्तार व पेरणी हीं स्वाभाविक व हितकर आहेत. मुंबई व मद्रास ह्या प्रांतांत आणि हैद्राबाद व म्हैसूर ह्या संस्थानांत तेथील सरकारांच्या अनुमतीनें व उत्तेजनानें साखरेचे कारखाने निघाले आहेत आणि आमच्या इलाख्यांत सांगली व औंध ह्या संस्थानांत लहान प्रमाणावर साखर करण्याची तयारी चालली आहे. कोल्हापूर व फलटण ह्या संस्थानांत कारखाने मागेंच निघालेले आहेत. ही सर्व घटना इकडील जनतेच्या हिताच्या आणि औद्योगिक उन्नतीच्या दृष्टीनें अगत्याची आहे. सिमला येथें हिंदी साखरेच्या संबंधांत नुकतीच जी चर्चा झाली आणि जिचा वृत्तांत आम्हीं आजच्या अंकांत दिला आहे, तीमध्यें ह्या प्रश्नाचा खल होऊन मद्रास व मुंबई प्रांतांच्या प्रतिनिधींनीं आपली बाजू साखर परिषदेपुढें जोरानें मांडली असल्याचें समजतें. तसेंच साखरसमितीच्या बैठकीमध्येंहि संयुक्तप्रांत व बिहार प्रांतांच्या वतीनें एक सूचना मांडण्यांत आली होती तिचा रोख देशाच्या दक्षिण भागांत झालेल्या व होणाऱ्या साखरेच्या उत्पादनाच्या मध्यवर्ती सरकारानें करावयाच्या नियंत्रणाकडे स्पष्ट होता. निरनिराळे प्रांत आणि संस्थानें ह्यांतील सरकारांनीं आपल्या लोकांची विशिष्ट परिस्थिति व गरजा ह्यांस अनुसरून औद्योगिक व आर्थिक कार्यक्रम आखले आहेत. त्यांस प्रतिकूल असेंच धोरण हिंदी साखरेच्या धंद्याचे बाबतींत स्वीकारावें लागेल आणि राजकीय व आर्थिक दृष्टीनें ह्या प्रश्नाचा विचार व्हावा लागेल. ह्या गोष्टीकडे मुंबई प्रांताच्या प्रतिनिधींनीं समितीचें लक्ष वेधलें आणि तिच्यापुढें मांडण्यांत आलेला ठराव अध्यक्षांच्या सूचनेवरून परत घेण्यांत आला असें समजतें. हिंदुस्थान सरकारास टारिफ बोर्डाच्या व प्रांतिक आणि संस्थानांच्या सल्ल्यानें व अनुमतीनें हिंदी साखरेचा प्रश्न सोडवावा लागेल हें स्पष्ट आहे. दक्षिण भागांतील प्रांत आणि संस्थानें ह्यांतील सरकार, कारखानदार व जनता प्रस्तुत प्रश्नाच्या संबंधांत जागरूक राहून आपलें कर्तव्य करतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

## फ्रान्समधील युद्धघटना

गेल्या आठवड्यांतली युद्धविषयक महत्त्वाची व खळबळ उडवून देणारी बातमी म्हटली म्हणजे पॅरिस सोडून पीछेहाट करण्याचा आलेला फ्रेंच सरकारावरचा दुर्धर प्रसंग ह्या विषयींची होय. फ्रेंच मुख्य प्रधानांनीं प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांस निर्वाणीचा निरोप पाठवला, त्यांत आपल्या सैन्यास शत्रूच्या प्रचंड यांत्रिक बळापुढें आतां टिकाव धरतां येणें शक्य नाहीं आणि अमेरिकेनें सहाय देण्यास एक दिवसाचाहि विलंब लावून चालणार नाहीं अशा आशयाचें केलेलें विधान होतें. आपले शेजारी फ्रेंच लोक भयंकर संकटांत सापडलेले पाहून त्याचा फायदा घेण्यासाठीं मुसोलिनीनें त्यांच्याशी युद्ध पुकारलें. फ्रेंच सैन्य जर्मनांच्या असंख्य चिलखती गाड्या आणि अगणित फौज ह्यांस निकरानें तोंड देऊन हळूहळू शिस्तीनें माघार घेत होतें. पण त्या सैन्यास दिवसानुदिवस विश्रांति नाहीं आणि कुमक येऊन मिळत नाहीं अशी बिकट स्थिति होऊन गेली. ब्रिटिशांचीं लढाऊ विमानें शत्रूच्या वहातुकीच्या साधनांवर व युद्धसामुग्रीवर सारखे हल्ले चढवीत राहिलीं होतीं. तथापि, माणसांच्या व सामानाच्या होणाऱ्या भयंकर हानीची पर्वा न करतां हिटलर नव्या व ताज्या पलटणी रणांगणावर पाठवितच होता. ह्या परिस्थितींत युद्ध चालू ठेवणें म्हणजे आपले शिपाई फुकट मरावयास देणें होय असें फ्रेंच सेनानींस वाटणें अगदीं स्वाभाविक होतें आणि युद्ध-तहकुबीची भाषा बोलणेंहि त्यांस भाग पडलें आहे. ह्या विचारांस मूर्तस्वरूप देण्याची जबाबदारी अत्यंत कठीण होती आणि म्हणून फ्रान्समध्यें एक मंत्रिमंडळ जाऊन त्याच्याजागीं दुसरें येणें अपरिहार्यच झालें. इंग्लंडमध्यें ह्या अनपेक्षित घटनेसंबंधानें गैरसमज उत्पन्न न होतां सहानुभूतीच निर्माण झाली ही गोष्ट लोकमतास समाधानकारक वाटली पाहिजे. ब्रिटिश मुख्य प्रधानांनीं ह्या संबंधांत प्रकट विधान करून जर्मनीचा पराभव होईपर्यंत इंग्लंड लढत राहणार हा कृतनिश्चय छातीठोकपणें जाहीर केला आणि या रीतीनें लोकविश्वास त्यांनीं दृढ केला.

निर्वाणीच्या प्रसंगींहि फ्रेंचांनीं न डगमगतां धैर्यानें त्यास तोंड दिलें आहे हें त्या राष्ट्रास अत्यंत भूषणावह आहे. ह्या योगानें फ्रेंच राष्ट्राचा लौकिक जगांत वाढला आहे.

---

**फ्रान्समध्यें युद्धतहकुबी आणि इंग्लंडमध्यें युद्धाची तयारी**

बोर्डो येथील फ्रेंच सरकारनें शेवटीं शत्रूशीं युद्धतहकुबीबाबत चर्चा करून जर्मनी व इटली ह्यांच्या अटी मान्य केल्या आहेत. ह्या अटी कडक असून त्यांचे योगानें फ्रान्स हतबल व परावलंबी झाला आहे. ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं फ्रान्स-मधील युद्धतहकुबीचे संबंधांत असे उद्गार काढले आहेत कीं, फ्रान्सनें जर्मनी व इटली ह्यांच्या मान्य केलेल्या अटी त्या राष्ट्राच्या स्वाभिमानास व स्वातंत्र्यास विघातक आहेत आणि त्यांचे योगानें शत्रूस इंग्लंड विरुद्ध युद्ध चालू ठेवण्यास सहाय होणार आहे. आपला दोस्त हतबल झाल्यानें स्वतःची जबाब-दारी विलक्षण वाढली आहे ह्याची जाणीव मि. चर्चिल ह्यांनीं प्रकट करून दाखविली आहे. इंग्लंड व त्याचे साथीदार कांहीं झालें तरी अखेरपर्यंत निकरानें लढणार असल्या-विषयींचा कृतनिश्चय त्यांनीं असंदिग्ध रीतीनें व्यक्त केला आहे. बोर्डोच्या सरकारनें शत्रूशी केलेला करार अनेक फ्रेंच पुढाऱ्यांस मान्य नाहीं आणि फ्रेंच साम्राज्यांतील लोकांनींहि तो अमान्य केला आहे. त्यांचें सहकारित्व इंग्लंडला लाभणार आहे. अमेरिकेचें सहायहि वाढत्या प्रमाणांत इंग्लंडला मिळूं शकेल अशी अपेक्षा आहे. ज्यांचें स्वातंत्र्य हिटलरनें पायाखालीं तुडवलें आहे त्या सर्व राष्ट्रांची सहानुभूति व पाठिंबा इंग्लंडला मिळेल आणि ग्रेट ब्रिटनशी सामना करणें ही सोपी गोष्ट नाहीं हें त्याच्या अनुभवास लवकरच येईल. भूमध्य समुद्रांत, आफ्रिकेंत व इटलीवर इंग्लिश विमानांचे जबरदस्त हल्ले चालले आहेत आणि मुसोलिनीस ते चांगले जाणावत असले पाहिजेत. त्याच्या प्रकट स्वार्थसाधूपणाचें प्रायश्चित्त भरपूर मापानें इटलीस मिळालें पाहिजे.

---

**सरकारची स्वदेशी साखरेची खरेदी**

हिंदुस्थान सरकारनें ३० लक्ष टन हिंदी साखर खरेदी करून देशी साखर कारखान्यांच्या डोक्यावरील बोजा हलका केला आहे. चालू हंगामातला साखरेचा माल पुढच्या हंगामांत तीन-चार लक्ष टनांइतका शिल्लक रहाणार असल्यानें कानपूरच्या बाजारांत अस्वस्थता उत्पन्न होऊन येत्या सालच्या खरेदी विक्रीच्या किंमती उतरल्या असल्याचें दिसून येते. साखरेच्या मागणी-पुरवठ्याच्या अंदाजावरून पुढच्या सहा महिन्यांतल्या खरेदीच्या सवयांचे भाव ठरत असतात. कानपूरच्या बाजारांत दर मणी बारा आणे–रुपया इतक्या सुमारांत साखरेचे भाव अलीकडे उतरले आहेत. कारखानदारांच्या संघानें (शुगर सिंडिकेट) साखर विक्रीवर नियंत्रण घालून तिचे भाव चढीचे ठेवले असल्यानें संयुक्त प्रांताच्या सरकारानें सिंडिकेटच्या सभासद-त्वाची प्रांतिक कारखान्यांवरच्या सक्तीची अट काढून टाकली असल्याचें अधिकाररीत्या प्रसिद्ध झालें आहे. साखर विक्रीस काढावयाची नाहीं ह्या संघाच्या धोरणानें मालाचा शिलकी साठा निष्कारण वाढून त्याचे भाव कृत्रिम रीतीनें चढीचे रहातात. हें धोरण इष्ट नाहीं असें संयुक्त प्रांताच्या सरकारास वाटून त्यानें वर निर्दिष्ट केलेल्या धोरणाचा अवलंब केला आहे.


**पूर्व खानदेश**
**सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
**जळगांव.**
(स्थापना : मे १९१६) रु.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. | ...... | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल | ....... | ४,६९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. | ...... | २,९८,०००।– |
| इतर फंडस्. | ...... | ३,७७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) | ...... | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—
मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



**बँका आणि त्यांचे व्यवहार**
दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.
किं. १ रु. ८ आणे
१ रु. १० आ. ९ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.
: लेखक :
प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे
बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें
अत्यंत उपयुक्त पुस्तक
" अर्थ " ग्रन्थमाला, : : पुणें ४.

# स्वदेशी साखरेच्या धंद्याच्या अडचणी

इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचे उपाध्यक्ष, मि. खारेघाट ह्यांनीं कौन्सिलच्या साखर-समितीच्या सिमला येथील बैठकीचे उद्घाटन प्रसंगीं माहितीनें भरलेलें व मुद्देसूद भाषण केलें, त्याचा गोषवारा आम्हीं खालीं देत आहों:-

## मि. खारेघाट ह्यांचें भाषण

हिंदी साखरेच्या धंद्याचे दृष्टीनें अत्यंत निकडीचा प्रश्न आज आपणांपुढें आहे, तो चालू हंगामांत साखरेचें उत्पादन मागणीच्या मानानें फाजील झालें आहे आणि सामान्यतः दीड लक्ष टनांचा वाढावा येतो, त्याचेऐवजी यंदा तीन-चार लाख टन अधिक पुरवठा होणार आहे, त्याचें काय करावें ह्या संबंधाचा आहे, "गंडस्योपरि पिटिका संवृत्ता" ह्या न्यायानें चालू हंगामांत उसाची लागवड वाढत्या प्रमाणांत झाली असल्यानें पुढच्या वर्षीं तीन चार लक्ष टन नेहमीच्या पेक्षा अधिक साखर तयार होण्याची खात्री आहे. ह्या रीतीनें पुढच्या वर्षीं मागणीपेक्षां देशी साखरेचा पुरवठा सहा-सात लक्ष टनांनीं ज्यास्त होणार असून त्याचा परिणाम साखरेच्या किंमती खालीं जाण्याची आणि कारखान्यांचा नफा नाहींसा होण्याची भीति आहे.

### उसाच्या किंमतीचा साखरेच्या किंमतीशीं मेळ

ही परिस्थिति निर्माण होण्यास कोण कारणीभूत झाले आणि त्यांत दोष कोणाचा आहे ह्याचा विचार न करतां ती परिस्थिति कसकशी उत्पन्न होत गेली ह्याची माहिती देणें उपयुक्त होईल. मार्च १९३४ मध्यें मध्यवर्ती सरकारनें दोन कायदे केले. एकानें कारखान्यांत होणाऱ्या साखरेवर पट्टी बसवण्यांत आली आणि दुसऱ्यानें उसाची किमान किंमत निश्चित करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस देण्यांत आला. शेतकऱ्यांस उसाचा योग्य मोबदला मिळवून द्यावा आणि साखरेवरील पट्टीचा बोजा त्यांचेवर पडण्यास प्रतिबंध करावा हा दुहेरी हेतु वरील कायद्यांपैकी दुसऱ्याच्या मुळाशी होता. संयुक्त प्रांत व बहार येथील सरकारांनीं ह्या कायद्याचा दीर्घ विचार करून साखरेची किंमत दरमणी ८ ते ९ रुपये आहे तोंपर्यंत उसाची किमान किंमत दरमणीं ५ आणे असावी आणि साखरेचा भाव वरील मर्यादेच्या वर-खाली जाईल त्या मानानें उसाची किंमत ज्यास्त-कमी करावी असें ठरवलें.ह्या रीतीनें उसाची किंमत साखरेच्या घावत्या किंमतीवर अवलंबून ठेवण्यांत आली. १९३४-३५, १९३५-३६ व १९३६-३७चा पहिला भाग ह्यांमध्ये वरील व्यवस्था समाधानकारक रीतीनें चालली. १९३७ च्या फेब्रुवारीमध्यें उसाचें पीक फार मोठें निघाल्याचें दिसून आलें आणि तो ऊंस प्रचलित भावानें आपणांस गाळतां येणार नाहीं असें कारखानदारांनीं कळवलें, ह्याच सुमारास साखरेवर पट्टी बसवण्यांत आली आणि तो बोजा सहन करून ऊंस खराब होत चालला असतां आपले कारखाने चालू ठेवणें त्यांस अशक्य होतें. जाग्रा ऊंस जाळून टाकण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून, साखरेची किंमत उतरली नव्हती तरी उंसाची अधिकृत किंमत ३-३½ आणे मण करण्यांत आली. ह्या रीतीनें शेतकऱ्यांची अडचण टळली, पण साखरेच्या धंद्यांत नवीन आपत्ति उत्पन्न झाली.

### सिंडिकेटची स्थापना

कमी किंमतीनें विकत घेतलेल्या उसापासून तयार झालेली साखर विकण्यांत कारखान्यांची तीव्र स्पर्धा चालू झाली आणि तिच्यामुळें साखरेचा भाव गडाडून धंदेवाल्यांस काय उपाय योजावा हें समजेनासें झालें. ह्या परिस्थितीवर तोडगा म्हणून कारखानदारांनीं एक संघ (सिंडिकेट) साखर विक्रीसाठीं स्थापन केला. त्याचें सभासदत्व खुषीचें होतें; पण संघशक्तीनें साखरेच्या किंमती आपणांस वाढवतां येतील अशी त्यांस आशा होती. भाव थोडे चढताहेत तोंच काँग्रेस मंत्रिमंडळें अस्तित्वांत आलीं आणि त्यांनीं शेतकऱ्यांस उसाची योग्य किंमत मिळाली पाहिजे असा आग्रह धरला.कारखानदार संघाचें सभासदत्व सक्तीचें केलें, नवीन कारखाने निघण्यास प्रतिबंध केला आणि प्रत्येक कारखान्यास त्याचें उसाचें क्षेत्र वांटून दिलें तर शेतकऱ्यांस आपण योग्य किंमत देण्यास तयार होऊं असें कारखानदारांनीं सरकारास कळवलें. शेवटीं दरमणी ५ आणे ही उसाची किंमत ठरली आणि ती साखरेच्या दरमणी ७ ते ७½ रुपये ह्या किंमतीशीं जुळती आहे अशी सामान्य कल्पना होती. संयुक्त प्रांत व बहार येथील सरकारांनीं कायदे करून वरील योजनेस मूर्त स्वरूप दिलें. परंतु हंगाम संपल्यावर साखरेच्या किंमती चढूं लागल्या आणि ह्याचें कारण उसाच्या पिकाची प्रतिकूल परिस्थिति हें होतें. ह्या किंमत वाढीचा उसाच्या किंमतीशीं कांहींच संबंध नव्हता. तरी १९३८-३९ च्या हंगामाचे प्रारंभीं साखरेच्या किंमती चढीच्या असल्यामुळें उसाची किंमत चढवण्यांत आली. ती दर ६ आणे ९ पै असा ठरवण्यांत आला आणि कारखान्यांस विकण्यांत आलेल्या उसावर लहान पट्टीहि बसवण्यांत आली. उसाचें पीक खराब निघाल्या कारणानें कारखानदार उसाला चढीच्या किंमती देऊं लागले, पण साखरेच्या भावाचें नियंत्रण करणें अव्यवहार्य असल्याचें दिसून आलें.

### उसास चांगला भाव

१९३८-३९ च्या हंगामाचे अखेरीस साखरेचे भाव उंच राहिल्यामुळें एक कमिटी नेमण्यांत येऊन वरील प्रश्नाची चर्चा झाली. तिच्या सूचनेवरून साखरेचे बाजारभाव आणि उसाच्या किंमती ह्यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यांत आला. साखर व ऊस ह्यांच्या किंमतींचें वर-खालीं जाणारें परस्पर-प्रमाण ठरवण्यांत आलें. हें प्रमाण अशा रीतीनें निश्चित करण्यांत आलें कीं साखरेचा भाव चढल्यामुळें कारखानदारास मिळणारा जादा नफा साखर महागली असतां कमी व्हावा. असें झालें म्हणजे साखरेचा भाव वाढवण्याचा कारखानदारांस होणारा मोह आपोआप नाहींसा होईल अशी ह्या व्यवस्थेंत अपेक्षा होती. १९३९-४० चा हंगाम चालू झाला तेव्हां युद्धामुळें साखरेचा भाव चढीचा राहिला. संयुक्त प्रांत व बहार येथील सरकारांनीं ठरवलेले उसाचे किमान दर साखरेच्या किंमतीच्या मानानें कमी होते, तरीहि ते बरेच चढीचे होते ह्या नंतर साखर आणखी महागली आणि त्या वाढाव्याच्या प्रमाणांत सरकारनें उसाचा दर चढवला. उसास ह्या रीतीनें चांगला भाव मिळाल्या कारणानें सामान्यतः गुऱ्हाळघरांकडे जाणारा ऊस साखर कारखान्यांत गेला. कारखान्यांपासून दूर असणाऱ्या शेतकऱ्यांस आपला ऊस साखरेसाठीं विकण्यास उत्तेजन देण्यांत आलें असेंहि दिसतें. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं साखरेचें एकूण उत्पादन मर्यादेच्या बाहेर वाढून त्याचा खप आतां कसा करावा ह्याची विवंचना उत्पन्न झाली आहे.

### ह्यावर उपाय कोणता ?

कांहीं लोकांच्या मतें अंगावर फाजील साखर पडली आहे तिचे दुष्परिणाम भोगावे लागूं नयेत ह्यासाठी योजावयाचा उत्कृष्ट तोडगा म्हटला म्हणजे १९४०-४१ च्या हंगामांत कारखान्यांतील उत्पादनाचें प्रमाण कमी करून पूर्वीच्या हंगामांतील उरलेला माल व नवीन होणारा पुरवठा ह्यांचा मेळ येत्या वर्षांतील खपाशी घालणें हा होय. हा उपाय व्यवहार्य नाहीं. त्याचा अर्थ असा होईल कीं कोट्यावधि मण वजनाचा ऊस शेतांमध्यें उभा राहून जाळून टाकावा लागेल. उसाचें पीक फार मोठें असल्यानें गूळ करण्याकडे त्यापैकी अगदीं थोडा भाग उपयोगांत आणणें शक्य होईल. प्रमाणाबाहेर गूळ झाला तर त्याचा तरी खप कसा होणार ? उसाचा नाश झालेला कोणत्याहि सरकारास बघवणार नाहीं. जर सरकार ऊस पिकवणारांस त्यांच्या पिकाचा उठाव होण्यास सहाय देणार नाहीं तर शेतकरीवर्ग कारखानदारांविरुद्ध उठण्याची भीति आहे. साखरेचें उत्पादन मर्यादित करण्याचा कोणा कारखानदारांचा विचार असेल तर त्यांनीं ती कल्पना अव्यवहार्य म्हणून सोडून द्यावी हें उत्तम. येत्या हंगामांत त्यांस ज्यास्तींत ज्यास्त ऊस गाळलाच पाहिजे आणि ते असें करतील ह्या भूमिकेवरच उपायचिंतन झालें पाहिजे. कित्येकजण असें सुचवतात कीं, साखरेच्या धंद्यावरचें सर्व नियंत्रण सरकारनें काढून घ्यावें आणि मागणी-पुरवठ्याच्या नियमास अनुसरून सर्व व्यवहार होऊं द्यावे. हा उपाय नसून निराशावाद आहे. खुल्या व्यवहारांच्या अमदानींत ऊस पिकवणारांस पुरेशी किंमत मिळेना म्हणून तर १९३४ मध्यें उसाची किमान ठरवणें भाग पडलें. १९३६-३७ मध्यें साखरेचें उत्पादन अधिक झालें ह्याचें कारण उसाची किंमत भारी होती, हें नव्हतें. असे प्रसंग पुन्हा उद्भवूं नयेत अशा करितांच साखर-कारखान्यांचें नियंत्रण करणारे कायदे करण्यांत आले. हे कायदे रद्द केल्यानें फाजील उत्पादनाचा किंवा सध्याच्या इतर अडचणींचा प्रश्न सुटणार नाहीं.

### कारखानदार-संघ मोडून टाकण्याची सूचना

कारखानदारांचा संघ मोडून टाकावा, नाहीतर निदान त्याचें सभासदत्व सक्तीचें नसावें अशीहि एक सूचना करण्यांत आली आहे. सध्याची अडचणीची परिस्थिति संघामुळें उत्पन्न झाली आहे ही कल्पना ह्या सूचनेच्या बुडाशी आहे. संघाची जबाबदारी कांहीं असो आणि तिच्याविषयी कोणाचें कांहींहि मत असो, तो मोडल्यानें प्रस्तुतची अडचण कशी दूर होणार आहे हें समजत नाहीं. संघ नाहींसा झाल्यास साखरेच्या बाजारांत स्पर्धेनें आपला माल कसेंहि करून विकण्याची धडपड कारखानदार करतील, लहान व पैशाचें पाठबळ नसलेले कारखानदार बुडतील आणि सर्वत्र असा गोंधळ माजेल कीं त्यापासून सट्टेबाजांचा फायदा कदाचित होईल, पण साखरेचा धंदा किंवा ऊस पिकवणारा शेतकरीवर्ग ह्यांचें कांहींच हित साधणार नाहीं. विशिष्ट परिस्थितीवर उपाय म्हणून कारखान्यांचा संघ स्थापण्यांत आला. त्या तऱ्हेची परिस्थिति निर्माण झाली असतां सध्याचा अवघड प्रश्न निराळ्या स्वरूपाचा आहे ह्या मुद्यावर तो नाहींसा करणें हा शहाणपणाचा मार्ग नव्हे. संघाची पुनर्घटना होण्याची आवश्यकता भासत असेल तर त्या गोष्टीचा विचार होऊं द्या; अथवा तऱ्हेचा संघ स्थापणें इष्ट वाटत असेल तर तसें करा; पण सध्याच्या प्रसंगीं ही संस्था मोडून टाकण्यानें अनेक कारखान्यांवर भयंकर आपत्ति येईल, शेतकऱ्यांचें नुकसान होईल आणि गोंधळ माजेल.

### मग योग्य उपाय तरी कोणता ?

फाजील साखर आपल्यापाशी पडून आहे आणि तीमध्यें भर पडून तो पुरवठा आणखी वाढणार आहे, त्यावर वर निर्दिष्ट केलेले उपाय लागू पडण्यासारखे नाहींत, तर दुसरे कोणते मार्ग अवलंबावे ह्या प्रश्नाचें उत्तर देणें अगत्याचें आहे. परिस्थिति अडचणीची आहे ह्यांत संशय नाहीं, पण तिनें घाबरून जाण्याचें मात्र कारण नाहीं. १९३७ सालीं साखरेचा पुरवठा असाच बेसुमार वाढला होता, पण थोड्या काळांतच त्याचा उठाव होऊन गेला ! सध्याच्या प्रसंगींहि पुढें सांगितलेले उपाय योजल्यास तसाच अनुभव येण्यासारखा आहे. (१) फाजील झालेली साखर साठवणें व पुढच्या हंगामापर्यंत धरून बसणें, (२) ह्यापुढचा पुरवठा कमी करणें व (३) मागणी वाढवणें हे ते उपाय होत. ह्यांतील पहिल्या उपायाच्या मार्गांत येणारी मुख्य अडचण मांडवल अडकून पडण्याविषयींची आहे. ह्या संबंधांत सिंडिकेटला योग्य अधिकाऱ्यांकडून सहाय मागतां येईल. साखरेच्या साठवणीसाठीं कोठारें लागतील, त्यांचीहि व्यवस्था होण्याजोगी आहे. साठवणींत साखरेची थोडी खराबी होण्याची भीति आहे, पण त्यावरहि शास्त्रीय सल्ला मिळूं शकेल. हा उपाय व्यवहार्य होण्यास शिलकी साठ्यांतला माल हळूहळू वर्षावर्षांनें काढून टाकला पाहिजे. त्याचप्रमाणें त्यांत भर पडणार नाहीं अशी खबरदारी घेणें जरूर आहे. येत्या व त्या पुढच्या हंगामांत कारखान्यांत वाजवीपेक्षा अधिक ऊस येऊं देतां कामा नये. योग्य वेळीं प्रचार करणें आणि १९४१-४२ च्या हंगामांत द्यावयाच्या उसाच्या किंमती अगोदर ठरवून जाहीर करणें ह्या गोष्टी येथें अगत्याच्या आहेत. शेतकऱ्यांस वेताचा फायदा पडेल असे उसाचे दर ठरविण्यांत आले असतां पिकाचें क्षेत्र मर्यादित राहील. संयुक्त प्रांत आणि बहार येथील कारखान्यांनीं घ्यावयाच्या उसाचीं क्षेत्रें आटपशीरपणानें आखून द्यावीं लागतील आणि ही आखणी हंगामाच्या पूर्वी करावी लागेल.

### कांहीं व्यावहारिक सूचना

कारखान्यांकरितां आखून दिलेल्या क्षेत्रांचे बाहेरील शेतकऱ्यांस एकदा पक्कें समजलें कीं आपला ऊस साखरेच्या उत्पादनासाठी घेतला जावयाचा नाहीं, म्हणजे ते आपलें क्षेत्र त्याप्रमाणें मर्यादित करतील आणि साखरेच्या ऐवजी गुळाकडे त्यांचें लक्ष आपोआप लागेल. येत्या हंगामांत नेहमीच्या मानानें गुळाचें अधिक उत्पादन करतां येईल. पण ह्या बाबतींत एक गोष्ट प्रामुख्यानें ध्यानांत बाळगली पाहिजे, ती ही कीं गुळाच्या उत्पादनास व खपास मर्यादा आहे. गुळासाठी थोड्या वेळांत पुष्कळ ऊस गाळून होणें शक्य नाहीं आणि गुळाचें उत्पादन विशेष मोठ्या प्रमाणांत झाल्यास त्याचे भाव उतरून त्याचा धंदा नुकसानीचा ठरेल. वरील उपायांचे बरोबर, साखरेस मागणी अधिक येईल आणि तिचा खप जनतेमध्यें वाढेल अशी व्यवस्था करणें आवश्यक आहे. ग्रेटब्रिटननें हिंदी साखर तातडीचा उपाय म्हणून खरेदी करावी ह्या सूचनेचा सरकार विचार करीत आहे. तथापि, हिंदी साखरेची किंमत परदेशी साखरेपेक्षा अधिक असल्यानें ग्रेटब्रिटनची खरेदी फार मोठ्या प्रमाणावर होईल अशी अपेक्षा करण्यांत स्वारस्य नाहीं. हिंदुस्थानांतला साखरेचा खप वाढण्याची तजवीजहि करणें जरूर आहे. त्यासाठीं प्रचार करणें

आवश्यक असून तो यशस्वी होण्यास साखरेची किंमत कमी करणें प्राप्त होईल. ह्या उपायांचे मार्गांत अडचणी निःसंशय आहेत. संयुक्त प्रांत व बहार येथें उसास भारी किंमत द्यावी लागते ही त्यांतली एक अडचण आहे. साखरेची किंमत कमी केल्यास शिल्की मालाची किंमत कमी होईल आणि त्याच्या साठवणींत अडकून पडणारा पैसा उभा करावा लागेल. हें सर्व केव्हां व कसें करावें हे तपशिलाचे प्रश्न आहेत.

## सारांश

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे वरील उपायांपैकी कोणताहि एक सद्यःस्थितीवर रामबाण म्हणून उपयोगांत आणतां येणार नाहीं, पण त्या सर्वांचा एकूण परिणाम इष्ट-फलदायी होईल ह्यांत संशय नाहीं. वर केलेल्या सूचना वैयक्तिक असून सरकारास त्या मान्य होतीलच असें नाहीं. ह्या सूचनांचा सारांश असाः— [ १ ] कारखान्यांनीं येत्या हंगामांत शक्य तेवढा अधिकांत अधिक ऊंस गाळावा; [ २ ] शिल्की साखर सुरक्षितपणानें साठवण्याची आणि ह्यासाठी भांडवल लागेल तें मिळवण्याची व्यवस्था करावी; [ ३ ] १९४१ मध्यें लावावयाच्या उसाचें क्षेत्र मर्यादित करून साखरेचें उत्पादन व पुरवठा हीं आटोक्यांत आणावीं; [ ४ ] कारखान्यांसाठी राखून ठेवलेलें उसाचें क्षेत्र योग्य रीतीनें आखलें पाहिजे, उसाच्या किमान किंमती ठरवल्या पाहिजेत आणि गुळाचें उत्पादन वाढवलें पाहिजे; [ ५ ] साखरेचा खप निर्गत, प्रचार व किंमतींत आतां किंवा पुढील हंगामाचे आरंभीं घट ह्या तीन मार्गांनीं वाढवणें आवश्यक आहे. शुगर सिंडिकेट आणि व्यापारी ह्यांनीं सहकार्यानें ही गोष्ट घडवून आणली पाहिजे. खप वाढेल ह्या बेतानें साखरेचा भाव त्यांचे हातून कमी करणें होणार नाहीं तर आयात जकात उतरवून सरकारास ती गोष्ट करणें प्राप्त होईल.

## शेवटची सूचना

हिंदी साखरेचा धंदा सावरून सुरक्षित व्हावयाचा असेल तर ऊंस पिकवणारे, कारखानदार, व्यापारी आणि मध्यवर्ती व प्रांतिक सरकार ह्या सर्वांनीं एकविचारानें जरूर ते उपाय योजले पाहिजेत. चांगल्या उसाची निपज, साखरेची व्यवस्थित साठवण, तिच्या उत्पादनाच्या पद्धतींत सुधारणा इत्यादि बाबतींत शास्त्रीय संशोधन होण्याची जरूरहि त्या बरोबरीनें महत्वाची आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे."

---

## पृथ्वीचा नकाशा बदलणार

पृथ्वीचें उष्णतामान वाढत चाललें आहे, तें १० डिग्रीनीं वाढलें तर काय परिस्थिति होईल, ह्याचें वर्णन हारवर्ड विश्व-विद्यालयांतील प्रोफेसर डॉ. मॅथर, ह्यांनीं केलें आहे. ते म्हणतातः-

" विषुववृत्तावर मनुष्यप्राण्यास रहाणें अशक्यप्राय होईल; उलट, ग्रीनलंडमधील बर्फ वितळून जाऊन तेथें शेती करितां येईल. आर्टिक महासागरांतील प्रदेशांत समशीतोष्ण हवा अनुभवास येईल. वितळणाऱ्या बर्फामुळें सागरांची खोली वाढेल आणि त्या कारणानें पृथ्वीचा अधिक भाग पाण्यानें व्यापला जाईल. न्यूयॉर्क, बॉस्टन, फिलॅडेलफिया, इत्यादि अमेरिकन किनाऱ्यावरील शहरें पाण्याखाली बुडतील, कारण उत्तर आणि दक्षिण ध्रुवाजवळील बर्फाच्या डोंगरांचें पाणी झाल्यामुळें समुद्रांची खोली ५० फुटांनीं वाढेल. युरोपांतील देशांचें तर फारच नुकसान होईल. फिनलंड बहुतेक सर्व नाहींसा होऊन प्रत्यक्ष रशियासहि मोठ्या प्रदेशास मुकावें लागेल. बाल्टिक समुद्र आर्टिक महासागरास मिळेल आणि नॉर्वे व स्वीडन मिळून एक नवीन बेट निर्माण होईल. हॉलंड अजीबात नाहींसें होईल. इंग्लंडचाहि नकाशा अर्थात पालटेल, आणखी १५ हजार वर्षें तरी हें सर्व घडण्याची भीति नाहीं. तेव्हां आज काळजी करण्याचें कारण नाहीं. "


BHARAT
Insurance Co., Ltd.

COMPLETES IN 1939
SOLID, SOUND, FRESH BUSINESS of
OVER RUPEES
2 CRORES 8 LAKHS
UNIVERSALLY RECOGNISED AS
A Leader among Indian Life Offices

*Previous rates of Bonus maintained as a result of the valuation for the quinquennium ended 31st Dec. 1938*

RS. 22-8 for Whole-Life Policies
RS. 17-8 for Endowment Policies

*Chairman:* SETH RAM KRISHNA DALMIA
*Director-in-Charge:* RAJENDRA KUMAR JAIN

BRANCHES

Agra, Ahmedabad, Ajmer, Allahabad, Ambala, Amritsar, Asansol, Bangalore, Barisal, Bombay, Calcutta, Colombo (Ceylon), Dacca, Dehra Dun, Delhi, Ernakulam, Gauhati, Indore, Jalpaiguri, Jammu, Karachi, Lahore, Lucknow, Madras, Madura, Multan, Muzaffarpur, Nairobi (E. Africa), Nagapur, Najibabad, Patna, Peshawar, Poona, Rajmundry, Rangoon (Burma), Rawalpindi, Secunderabad, Shillong, Sialkot, Sukkur, Surat, Karwar

Head Office: LAHORE

# फ्रान्स

फ्रान्सचें क्षेत्रफळ २ लक्ष, १३ हजार चौरस मैल असून त्याची एकूण लोकसंख्या ४ कोटि, १० लक्ष आहे; त्यांपैकी ४९ टक्के शहरवासीय आहेत. म्हणजे, शेतकी व उद्योगधंदे ह्यांत लोकसंख्येची साधारणपणें समसमान वाटणी झालेली आहे. गेल्या कांहीं वर्षांत लोकसंख्या स्थिर असून त्यांत किंचित् घटच झाली असेल. युरोपियन संस्कृतीचा झेंडा उंच ठेवण्याचें कार्य फ्रान्स कित्येक वर्षें करीत आहे. फ्रेंच लोक उत्साही, उद्योगी, सहनशील व प्रामाणिक असल्याविषयींची ख्याति आहे. भूमध्य समुद्राच्या सान्निध्यानें बेफिकीर व रंगेली वृत्ति आणि कलाकुसरीची आवड ह्यांचा त्यांच्या स्वभावांत परिपोष झालेला दिसतो.

फ्रान्सचा किनारा लांबच लांब आहे. ॲटलँटिक महासागराचे बाजूस त्याचा किनारा १,३०४ मैल लांब असून भूमध्य समुद्रावरील किनारा ४५६ मैल लांब आहे. साधारणपणें फ्रान्स देश सपाट असून अर्ध्याहून अधिक प्रदेश समुद्रसपाटीपासून ६५० फूट उंचीवर आहे. देशांतील नद्यांच्या ओघावरून देशाच्या स्वाभाविक रचनेची सहज कल्पना येईल.

रेल्वेनें होणारी वहातुक नद्या, कालवे इ०नीं होणाऱ्या वहातुकीपेक्षा दुप्पट आहे. परंतु स्वित्झर्लंड, जर्मनी व बेल्जिअम यांच्याशीं होणारी कोळसा व लोखंड यांची बरीचशी वहातुक जलमार्गानेंच होते. जर्मनी व बेल्जिअम यांच्याशीं होणाऱ्या व्यापारास ह्या मार्गाचें महत्त्व विशेष आहे. मार्सेल्स, डंकर्क, बोर्डो, कॅले इत्यादि बंदरें महत्त्वाचीं गणलीं जातात. या बंदरांतून होणारी आयात-निर्यात बरीच मोठी आहे.

पॅरिसच्याजवळच मुख्य विमानगृह असून तेथून सर्व युरोपभर व फ्रेन्च आफ्रिकेला विमानें जात-येतात. सबंध देशभर आगगाड्यांचें जाळें पसरलें असून दक्षिण, पश्चिम आणि उत्तर विभाग कंपन्या त्या त्या विभागांत चढाओढीविना वहातुकीचें कार्य उत्तम रीतीनें पार पाडीत आहेत. एकंदर रेल्वेजच्या मैलांच्या भागावर विजेच्या गाड्या चालतात.

फ्रान्सचें आतांपर्यंतचें वैभव व राजकीय स्थान देशांतील सुपीक जमिनीवर अधिष्ठित झालेलें आहे. काम करणारांपैकी ४० टक्के लोकांचें जीवित शेतीवर अवलंबून आहे. आपल्या कर्डाल पद्धतीप्रमाणें फ्रान्समध्यें जमिनीच्या स्वतंत्र मालकीच्या लहान लहान तुकड्यावरच शेती करण्याची पद्धत आहे. गहूं, ओट, राय, बार्ली ह्यासारख्या पिकाखालीं ५७% जमीन आहे. आणि फक्त ९% जमिनींतून उद्योगधंद्यांना लागणारीं पिकें काढलीं जातात. फ्रान्स मदिरा मदिराक्षीचा प्रदेश आहे. जगप्रसिद्ध सर्वोत्कृष्ट मदिरा फ्रान्सच्या शॅंपेन, बर्गंडी व बोर्डो प्रांतांतून येते.

ओक, बीच व पुष ह्यांच्या झाडांचीं अरण्यें फ्रान्सभर इतस्ततः पसरलीं आहेत. कोंबड्या, गाई, मेंढरें, बकरी, घोडे, डुकरें, गाढवें आणि खेचरें फ्रान्सच्या विस्तीर्ण कुरणांत चरत असतात. दक्षिण भागांत गाईंच्या ऐवजीं बकऱ्या आणि घोड्यांच्या ऐवजीं गाढव-खेचरें दृष्टीस पडतात. दुधाचा व अंड्यांचा धंदा फ्रान्समधील महत्त्वाचा एक धंदा गणला जातो. मच्छेमारीच्या धंद्यांत १ लक्ष ६० हजार माणसें गुंतलीं असून दरसाल अंदाजीं ६॥ कोटि रुपयांचा धंदा करतात.

आल्सेस व लॉरेन्स हे कोळसा, लोखंड, तेल व पोटॅशच्या खाणीमुळें प्रसिद्ध असून त्यांच्या अनुषंगानें कापडाच्या व इतर गिरण्या भरभराटीस आल्या आहेत. शिसें, जस्त, मॅंगनीज इत्यादि खनिज पदार्थ साधारण प्रमाणांत सांपडतात; फक्त कोळशाची वाण फ्रान्सला अतिशय भासते.

अमोनिअम सल्फेट व बेंझॉल तयार करण्याचे कारखाने उत्तर फ्रान्समध्यें आहेत. पॅरिसच्या आसपास मोटार तयार करण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. तसेंच शेतकीच्या उपयोगाचीं यंत्रें, व इतर हत्यारें करण्याचे कारखाने चांगली प्रगति दाखवितात. रेशमाच्या धंद्याबद्दल फ्रान्स प्रसिद्ध; त्याच्या जोडीला कापडाच्या व लोकरीच्या धंद्याला फ्रान्सनें सुरवात केली असून त्यांत त्यास यशहि येत आहे. पॅरिसचें नांव श्रीमन्त, खुशाल व चैनी लोकांच्या जिभेवर; तेथील बहुमोल कपडे, फर्निचर, सुवासिक तेलें, सोन्या–चांदी–रत्नांचे दागिने सर्व जगभर प्रसिद्ध आहेत. साखर, साबण, तेलें, हातमोजे, कागद, बंदुकी, शोभिवंत चिनी मातीचीं भांडीं व वस्तू, चटया, गालिचे, आरसे, रिबन्स, लेसेस व घड्याळें फ्रान्समध्यें निरनिराळ्या ठिकाणीं तयार होतात.

फ्रान्सचा आयात-निर्यात व्यापार मोठा आहे. निर्गतींत रेशमी कापड व कपडे, सार्चे कापड, लोकरीच्या सुताच्या लड्या, कापड व कपडे, यंत्रें, दारू, मोती, जडजवाहिर, साबण व अत्तरें, मोटारी, काचसामान इत्यादींचा समावेश होतो. आयातींत कोळसा, यंत्रें, रसायनिक द्रव्यें, इत्यादि गोष्टी असतात.

भूमध्य समुद्रांतील कोर्सिका बेट फ्रान्सच्या ताब्यांत आहे. त्याचें क्षेत्रफळ ३·३६७ चौरस मैल आहे. बहुतेक भाग डोंगराळ आहे. गहूं, ऑलिव्ह व कांहीं फळें हें या बेटाचें मुख्य उत्पन्न. बेटाचें हवापाणी उत्तम आहे, परंतु आतांपर्यंत ⅓ भागच उपयोगांत आणला आहे. इतर भागांत अरण्यें आहेत.

फ्रान्सच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांचें एकूण क्षेत्रफळ ४५ लक्ष चौरस मैल असून त्यांतील लोकसंख्या ९ कोटींवर आहे. आफ्रिकेंतील अल्जेरिया, ट्यूनिस, मादागास्कर, फ्रेंच पश्चिम ऑफ्रिका, फ्रेंच गिआना, फ्रेंच आयव्हरी कोस्ट, फ्रेंच सुदान, साहारा वाळवंटांतील ९½ लक्ष चौरस मैल प्रदेश, फ्रेंच सोमालीलँड, मोरोक्को इत्यादि; आशियामध्यें सिरिया; हिंदुस्थानांतील पॉंडीचरी व चंद्रनगर; ब्रह्मदेशांतील तीन ठिकाणें; फ्रेंच इंडो–चायनांतील कांहीं ठिकाणें; तसेंच अमेरिकेंत व ऑस्ट्रेलियांत कांहीं प्रदेश व ८ चौरस मैल क्षेत्रफळ असलेलें मनोका एवढ्या भू-विस्तारावर फ्रान्सचा ताबा आहे.


**Gokhale Institute of Politics & Economics**

**Servants of India Society's Home, Poona 4**

ADMISSIONS TO STUDENTS—reading for the M. A. Examination by paper or by thesis in Economics. Two scholarships of Rs. 25 p.m. to be awarded to research students.

D. R. Gadgil,
Director

### साखरेचे भाव चालू हंगामांत उतरत नाहींत

इंडियन शुगर सिंडिकेटनें एक पत्रक काढून असें जाहीर केलें आहे कीं, संयुक्त प्रांतांतील साखर कारखान्यांस ऊस गाळण्यास परवाना मिळण्यासाठी सिंडिकेटचे त्यांनीं आपलें सभासदत्व सिद्ध केलें पाहिजे असा कायद्याचा नियम आहे, तो प्रांतिक सरकारनें रद्द केला असला तरी चालू हंगामांत साखरेच्या किंमती नियंत्रित करण्याचा त्याचा अधिकार कायम आहे. ह्या कारणानें सिंडिकेटच्या समासद् कारखान्यांच्या जबाबदाऱ्या अबाधित आहेत. साखरेचे किमान भाव चालू हंगामांत, कांहीं झालें तरी, कमी केले जाणार नाहींत अशी खातरजमा, शुगर सिंडिकेटनें केली आहे. हिंदुस्थान सरकारानें सिंडिकेटच्या मार्फत एक लक्ष टन साखर हलक्या भावानें विकत घेतली असल्याकारणानें आतां साखरेच्या सामान्य किंमती उतरल्या जातील अशी कल्पना लोकांमध्यें पसरण्याचा संभव असल्यानें सिंडिकेटनें वरील आश्वासन दिलें आहे. त्याचा परिणाम चालू हंगामांत साखरेचे बाजारभाव स्थिर रहाण्यास सहाय देण्यांत होणार आहे. ह्या भावांमध्यें अनिष्ट चलबिचल होऊन व्यापारी व कारखानदार ह्यांच्या मनांमध्यें संशय उत्पन्न होऊन बाजारांत निष्कारण अनिश्चितपणा पसरूं नये हा सिंडिकेटचा उद्देश यशस्वी होईल ह्यांत संदेह नाहीं.

### निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

#### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १०६ |
| ४% १९४३ | १०३—० |
| ३½% बिनमुदत | ८६—८ |
| ३½% १९४७–५० | ९८—८ |
| ३% ( १९६३–६५ ) | ८५–१५ |
| २¾% १९४८–५२ | ९२—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १००—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ९९—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १०६—० |

#### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १३३—८ |
| बँक ऑफ बडोदा ( १००—५० ) १०% | ९५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% | ३२—८ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १४४०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ९७—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२–१५—० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६१—२—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १२३–१२ |
| कराची ( १०० ) ९% | १५८–१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १६२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १२६५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४४२—८ |


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या

मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन

कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स

कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.

मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे

★ सत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस

★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस : ९९१A सदाशिव, पुणें २

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एससी.




स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शोच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )

२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स अॅकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

—ॐ सत्यमेवजयते—
सुकामेवा एक आणा पाकीट
निरनिराळे सर्व किराणा
लोणच्याचें साहित्य
म्हणजे
मोहरीची डाळ, मोहरी भुकणी, मोहरी तेल ( पॅक बाटल्या ), मेथी भरडा, स्पेशल हिंग,
तांबडें लाल ( भडक ) तिखट भुकणी इत्यादि खात्रीचा माल तयार आहे.
लोणच्याचा तयार मसाला पूड तयार आहे !
—: दत्तात्रय नारायण हेर्जीब :—
किराणा व सुकामेवा व्यापारी, २० शुक्रवार पेठ, पुणें २
लोणचीं, पापड, मसाले, मेतकूट सदैव तयार असतात.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.